बेकी

एका कर्णबधीर मुलीची गोष्ट



करेन हिरश

चित्र: जो एस्को

मराठी – अलका महाजन



बेकी

एका कर्णबधीर मुलीची गोष्ट

करेन हिरश

चित्र: जो एस्को

मराठी अनुवाद – अलका महाजन



बेकीला ऐकू येत नसे. बालपणीच झालेल्या आजारमुळे ती बाहिरी झाली होती. श्रवणयंत्र वापरूनही तिला फक्त मोठे आवाजच ऐकू येत. आपला नेहमीचा आवाज तर तिला अजिबातच ऐकू येत नसे.

बेकी माझी ‘पार्ट-टाइम’ बहीण आहे. ती सोमवार ते शुक्रवार आमच्याबरोबर राहते आणि शाळेत जाते. तिला तिचे आई-वडील आणि भावंडे आहेत. शाळेला सुट्टी असली की ती त्यांच्याकडे राहायला जाते. ते सगळे एका शेतमळ्यात राहतात.

प्रथम जेव्हा मला समजलं की बेकी आमच्या घरी राहायला येणार आहे, तेव्हा मला ते अजिबात आवडलं नाही.

“ आई, तिला इथे का राहायचं आहे?” मी विचारलं. “अनोळखी कोणीही मूल मला घरात नकोय.”

आई म्हणाली, “मी कर्णबधीर लोकांबद्दल एका वर्तमानपत्रात लेख वाचला. त्यात लिहिलं होतं की खेड्यातल्या मुलांसाठी शहरात आसरा हवा आहे. त्याची खूप गरज आहे. आणि आपल्या घरात एक जास्त खोलीही आहे.”

नंतर मला जवळ घेऊन ती पुढे म्हणाली, “काळजी करू नकोस! लवकरच तुझी आणि तिची ओळख होईल.”

तरीही मी निश्चिंत नव्हते. ती जास्तीची खोली माझी आणि माझ्या भावाची खेळण्याची खोली होती. आणि आता ती बेकीची होणार होती. आम्हाला ते अजिबातच आवडलं नाही. आणि मी तिला कसं समजून घेणार? ती तर बाहिरी होती न!



बेकीला पहिल्यांदा पाहिलं आणि मला आश्चर्यच वाटलं. दोन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. मला वाटलं होतं की ती इतरांपेक्षा वेगळी दिसत असेल. पण ती तर जीन्स, टी-शर्ट आणि पोनीटेल मध्ये इतर सर्वसामान्य मुलींसारखीच दिसत होती.



ऑगस्ट महिन्यात बेकी तिच्या आई-वडिलांबरोबर आम्हाला भेटायला आली त्यावेळी तीही घाबरलेली होती आणि मीही घाबरले होते. आमचे पालक एकमेकांना भेटल्यावर थोड्या वेळानी आम्ही एकमेकींकडे पाहिले. ती बाहिरी आहे यावर माझा विश्वासच बसला नाही. थोड्या वेळाने मी त्या खोलीत गेले.

“खेळायला येणार का?” मी तिला विचारलं. तिने काहीच उत्तर दिले नाही. माझ्याकडे पाहून ती फक्त थोडंसं हसली. मला काही समजलं नाही आणि काय करावं हेही सुचलं नाही. मी आपली खोलीबाहेर पडले!




शाळा सुरू होण्याच्या एक दिवस आधी बेकी आमच्याकडे राहायला आली. ती तिचे आई वडील आणि पाच भावंडे यांच्याबरोबर गाडीतून आली. त्या सर्वांनी तिचं समान उतरवलं. मी गॅरेजमधून पाहत होते.

ती गंभीर होती. तिच्या मोठ्या भावाने तिला दोनदा गुदगुल्या केल्या. धाकट्या बहिणीने तिला टॉफी दिली. सगळ्यांनी तिला मिठी मारली आणि तिचा निरोप घेतला. बेकी मात्र स्तब्ध उभी होती.



लाकडांच्या ढिगाऱ्यावर मला एक फ्रिसबी दिसली. ती घेऊन मी बाहेर आले.

“खेळणार का ग?” मी विचारलं आणि तिला समजावं म्हणून फ्रिसबी दाखवली. आम्ही थोडा वेळ फ्रिसबी खेळलो. त्यानंतर मी माझे स्टिल्ट, म्हणजे चालण्याच्या उंच काठ्या शोधून काढल्या. ते घालून तिला चालण्यासाठी मदत केली. ते ती लगेच शिकली. त्यावर न पडता रस्त्यापर्यंत चालत जाऊन आली.



मग ती माझ्याकडे पाहून हसली. तिने खिशातून एक दोरी काढली. दोरी बोटात घालून इकडे तिकडे फिरवू लागली. तिने एक सुंदर जाळीदार नक्षी तयार केली. मी हा प्रकार कधीच पाहिला नव्हता. नंतर दोरी माझ्या हातात देऊन ती हसली आणि तिने मला खूण केली. मला तो खेळ खेळायचा होता, पण कसा ते माहीत नव्हतं. मी नुसतेच खांदे उडवले. बेकीने दोरी माझ्या बोटात घालून प्रात्यक्षिक दाखवले.





खरं तर बेकीचा सहवास मला आवडू लागला होता. विशेषतः पावसाळ्यात. या दिवसात एकतर आम्ही चित्रे काढत होतो नाहीतर कसरती करत होतो. कधीकधी आम्ही बाहुल्या तयार करत होतो किंवा बाबांना चोकॉलेट करायला मदत करत होतो. आम्ही दोरीचे खेळही खेळलो. बेकीने मला जाळीचे खूप नमुने करून दाखवले. काही प्रकार आम्ही दोघींनी मिळून केले.

मी आईला या खेळाबद्दल सांगितल्यावर ती म्हणाली की त्याला “कॅट’स क्रेडल” असे म्हणतात – म्हणजे ‘मांजरीचा पाळणा’! हा खूप जुना खेळ आहे आणि प्रत्येक नमुन्याला विशिष्ट नाव पण आहे.

एकमेकींशी संभाषण करणं मात्र आम्हाला जड जात होतं. नंतर बेकीने शाळेत सांकेतिक भाषा शिकायला सुरुवात केली. ती हातांचा वापर करून, खुणा करून शब्द दाखवू लागली. माझे आई-बाबा ती भाषा शिकले, आणि त्यांनी मलाही ती शिकवली. या सगळ्याची बेकीशी बोलताना खूप मदत झाली.

बेकी ओठांच्या हालचालींवरून शब्द ओळखायला शिकली. तिच्याकडे बघून, सांकेतिक भाषा वापरुन आम्ही आता बोलू लागलो.



शाळा सुटल्यावर कधी कधी बेकी माझ्या मैत्रिणींबरोबर बॉल आणि ठिकरी हे खेळ खेळत असे. बहुतेक वेळा खेळ ठीक चालत असे, पण कधी कधी मला तिचा राग येत असे.

एखाद्या खेळाचे नियम कठीण असतील तर मला सांकेतिक भाषेत ते नीट सांगता येत नसत. मग बेकी वैतागून रडत असे. तरीही तिला तो खेळ खेळायचा असे. मग माझ्या मैत्रिणी चिडून म्हणत, “तिला खेळायला घेऊ नकोस. फार त्रास देते ती.”

“घरात जा आईकडे” – मी शेवटी तिला संगत असे.

“नाही, मी खेळणार!” असं म्हणून ती जोरजोरात रडत असे.

मग एकतर मी तिला घरी घेऊन जाय असे, नाहीतर भांडण ऐकून आई बाहेर येत असे!




ऐकूच येत नसल्यामुळे बेकी स्वतःचा आवाजही ऐकू शकत नसे. ती कधी कधी नकळत खूप कर्कश आवाज काढत असे. पण तिला ते समजत नसे.

एक दिवस मी, बेकी आणि बाबा लायब्ररीत गेलो होतो. तिथे बेकीने एक माणसाला कुबड्या घेऊन चालताना पाहिले. उत्सुकतेने ती सारखी त्याच्याकडे बोट दाखवू लागली.

“तो जखमी झाला आहे का?” तिने खुणेने विचारलं. नंतर ती जोरजोरात रडू ओरडू लागली. सगळे लोक तिच्याकडे बघत होते.

चूप म्हणूनही उपयोग नव्हता कारण आपण ओरडत आहोत हेच तिला समजत नव्हते.

बाबांनी त्या माणसाला समजावले आणि आम्ही तिथून निघालो. गाडीत याबद्दल बोलताना बाबा म्हणाले, “बेकीला अजून खूप काही सांगायचं होतं पण तिच्याकडे शब्द नव्हते म्हणून ती चिडली.”



आणखी एकदा बेकी अशीच चिडली. शॉपिंग मॉल मध्ये तिला तिचे म्हणणे आम्हाला समजावून सांगता आले नाही.


“मला पाहायचं आहे” – तिने खुणेने सांगितलं आणि ती थबकली. तिला पुढच्या शब्दाची खूण माहीत नव्हती किंवा दाखवता येत नव्हती. पुन्हा ती खूप रडली.

“पाळीव प्राण्यांचं दुकान?” आईने खुणेने विचारलं.

“नाही” – बेकीने खूण केली.

“आइस्क्रीमचं दुकान?” – “नाही” –

ती पुन्हा रडली आणि तिने आईला झिडकारून टाकलं.





एक माणूस हे सगळं पाहत होता.

“बघ किती हट्टी आणि बेशिस्त आहे ती मुलगी!” – तो आपल्या मुलाला म्हणाला.

त्याचे बोलणे ऐकून मला खूपच राग आला.

“ती हट्टी आणि बेशिस्त नाही!” मी म्हणाले. “तिला फक्त ऐकू येत नाही.”

तो माणूस खजील झाला आणि घाईघाईने निघून गेला.

नंतर असे प्रसंग फारसे आले नाहीत. बेकीची सांकेतिक भाषा सुधारत गेली आणि आम्हालाही सराव झाला.

एका रात्री पियानो शिकण्यावरून माझी आणि आईची वादावादी झाली. शाळा नुकतीच सुरू झाली होती आणि बेकी आमच्याकडे राहायला आली होती. माझे पियानोचे धडे दुसऱ्या दिवशी सुरू होणार होते. मला ते फार भयंकर वाटत. मला पियानो शिकायचा नाही हे आईला पटवण्याचा मी खूप प्रयत्न केला. आईने अजिबात चर्चा केली नाही. ती म्हणाली की मी अजून एक वर्ष तरी पियानो शिकायला हवा. रोज अर्धा तास तरी सराव झालाच पाहिजे.

मला रडायचं नव्हतं खरं तर. पण रागाच्या भरात मला रडू अवरेना. कोणीतरी माझ्या खांद्याला स्पर्श केला. ती बेकी होती.

“चल, वर जाऊया.” तिने खूण केली. तिने माझ्या खांद्यावर हात ठेवला. तिच्या खोलीत गेल्यावर मी थोडा वेळ रडले. बेकी बरोबर होती त्यामुळे मला खूप बरं वाटलं.



काही दिवसांनी आम्ही बेकीची खोली पुन्हा खेळण्यांची खोली करण्याचा निर्णय घेतला. मग माझी खोली आमच्या दोघींची झाली. आम्हाला खूप मजा येऊ लागली. आम्ही उशा घेऊन मारामारी केली की आई येऊन ओरडत असे. तिचं खुणांच्या भाषेतलं ओरडणं फार मजेशीर दिसायचं!



“अजून फक्त एक महिना बेकी आपल्याबरोबर असेल. मग उन्हाळ्याच्या सुट्टीत ती तिच्या घरी जाईल. आणि पुढच्या हिवाळ्यात ती मुकबधीर मुलांच्या वसतिगृहात जाणार आहे.” आम्ही बाबांबरोबर गाडी धूत होतो तेव्हा त्यांनी सांगितलं.

“ती इथेच राहून याच शाळेत का नाही जाऊ शकत?” मी विचारलं.

बाबांनी मला आणि बेकीला साबणाच्या पाण्याची बादली आणि फडकं दिलं. “बेकीला तिकडे अधिक चांगलं शिक्षण मिळेल असं तिच्या आईबाबांना वाटतं.” बाबा म्हणाले. “काळजी करी नकोस, आपण कायम तिचे दोस्त राहू.”

“पण बेकी तर माझी बहीण आहे!” मी म्हणाले.



त्या रात्री मी आणि बेकीने आमच्या खोलीत खूप गप्पा मारल्या. अर्थात खुणांच्या भाषेत! मी तिला सांगितलं की मला तिची फार आठवण येईल. तिने केव्हाही आम्हाला भेटायला यावं. तिच्या नवीन शाळेबद्दलही आम्ही बोललो.

मग आम्ही मांजरीशी खेळलो. आई खोलीत आली आणि म्हणाली, “चला मुलींनो, आता झोपायची वेळ झाली.”

आम्ही अंथरूणात शिरलो आणि आईने दिवा मालवला.

मी रोजसारखा बेकीचा हात हातात घेतला.





“शुभरात्री” मी तिच्या हातावर लिहिलं.

“शुभरात्री” बेकीने हाताने खूण केली.

अंत